



दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

● dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955






●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ४ थे ●अंक २३७ ●बुधवार, दि. ०४ डिसेंबर २०२४ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये


# खाकीत ना नेक ना नूर, संचारला आसुर ! टॉवर कंपनीचे हस्तक होऊन हातापाई ?

## बालाघाटावरील सुलतानपूर येथील शेतकऱ्यांने मावेजासाठी अंगावर पेट्रोल घेतले ओतून

### बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार संपेना

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांचा धुमाकूळ सुरूच असुन पोलिस प्रशासनाला हाताशी धरून १ रूपयाही मावेजा अथवा नोटीस न देताच उभ्या ऊसाच्या पिकांचे नुकसान करत स्टींगिंग म्हणजे तार ओढणे सुरू असल्याने मावेजा मिळण्यासाठी सुलतानपुर येथील शेतकरी पंजाब अनुरथ नाईकवाडे वय ४२ वर्ष यांने आज दि.३ मंगळवार रोजी दुपारी साडे ३ च्या दरम्यान कंपनीच्या मनमानी कारभारामुळे न्याय मिळत नसल्याने अखेर पोलिस प्रशासनासमोर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला. पोलिस प्रशासनाच्या दक्षतेमुळे दुर्घटना टळली.पोलिस प्रशासनाने पंजाब अनुरथ नाईकवाडे व त्यांचे वडील अनुरथ नाईकवाडे यांना शासकीय कामकाजात अडथळा आणला व आत्महत्येचा प्रयत्न म्हणून पोलिस अधीक्षक यांच्या आदेशान्वये गुन्हा दाखल करावयाचा आहे म्हणून चौसाळा पोलिस चौकीत आणले.

मावेजा न देताच पवनचक्की कंपनी व पोलिस प्रशासनाच्या दबावाखाली दांडगाईने काम सुरू केल्याने आत्मदहनाचा प्रयत्न: पिडीत शेतकरी पंजाब नाईकवाडे

ओटु पावर पवनचक्की कंपन्यांच्या अधिका-यांनी मला कोणताही पुर्वसुचना व नोटीस न देताच माझ्या सुलतानपुर शिवारातील गट नंबर २४७,२५०,२५१ मधील उभ्या ऊसाच्या पिकातुन १ रुपयाही मावेजा न देताच काम सुरू करत शासनाचे आदेश असल्याचे सांगत पवनचक्की कंपनीचे अधिकारी व पोलीस प्रशासन यांनी माझी कोणतीही बाजु ऐकुन न घेतल्याने मला शेवटी अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न करावा लागला.परंतु माझी तक्रार ऐकून न घेताच अगदी गुन्हेगाराप्रमाणे मला व माझ्या वयोवृद्ध वडीलांना पोलिस अधीक्षक यांचे आदेश असल्याचे सांगत सपोनी चंद्रकांत गोसावी यांच्या टीमने चौसाळा पोलिस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यासाठी आणले.



**बालाघाट म्हणजे नेते आणि पोलिसांना सुगीचे दिवस देणारा भाग. टॉवर कंपनी कडून चिरीमिरी घेऊन पोलीस काम करत असतील तर अवघड आहे असे लोक बोलत आहेत. बालाघाटावर टॉवर कंपन्यांचे चांगलेच पेव फुटले असून ओ टू पॉवर ही कंपनी सारे नियम गुंडाळून शेतकऱ्यांना वेठीस धरत आहेत. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांमध्ये अवजड वाहने घालणे, विरोध करणाऱ्या शेतकऱ्यांच्या विरोधात प्रसंगी खाजगी गुंडांचा वापर करणे अशा गोष्टी घडत आहेत. सुरूवातीपासूनच नेकनूर पोलिसांची भूमिका संशयास्पद असून कंपनीची उचल घेऊन दंडेलशाही करत असून गोरगरीब शेतकऱ्यांना कोणी वाली आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**

पोलिस अधीक्षक यांच्या आदेशान्वये कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आमची : सपोनी चंद्रकांत गोसावी

पोलिस अधीक्षक यांच्या आदेशानुसार पवनचक्की कंपन्यांनी घेतलेल्या पोलिस संरक्षण अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आमची असुन आम्ही ती पार पाडत आहोत. चौसाळा पोलिस चौकीत करून पंजाब नाईकवाडे व त्यांच्या वडीलांना गुन्हे ▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठी पत्रकार परिषद च्या आरोग्य शिबिराला मोठा प्रतिसाद

## बीड जिल्ह्यात 1 हजारांच्या वर पत्रकारांनी सहभाग नोंदवल्या बद्दल मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी मानले आभार

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांच्या म ार्गदशनाखाली पूर्ण राज्यात काल ३ डिसेंबर रोजी मराठी पत्रकार परिषद च्या ८६ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या राज्यात जागोजागी रक्तदान शिबिर घेण्यात आले. यावेळी एकूणच जवळपास राज्यातून १० हजारांच्या वर पत्रकारांनी आपल्या परिवारासह या शिबिरात सहभाग नोंदवून आरोग्याची तपासणी केल्या बद्दल एस एम देशमुख यांनी मानले आभार.



बीड जिल्हा रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने काल बीड जिल्हा रुग्णालयात पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . या शिबिराला मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. बीड जिल्हात चांगलाच प्रतिसाद मिळाला आहे. जिल्ह्यातून सर्व अकरा तालुक्यातून मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. यात बीड, गेवराई, माजलगाव, परळी, अंबाजोगाई, धारूर, वडवणी, केज, आष्टी, पाटोदा, शिरूर(का.) या तालुक्यातून मराठी पत्रकार परिषद ने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत आपल्या परिवाराच्या व स्वतः च्या आरोग्याच्या मोफत तपासण्या करून घेतल्या आहेत. व

▶▶ उर्वरित पान २ वर



*येत्या ५ तारखेला मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या महायुतीच्या शपथविधी सोहळ्याच्या तयारीचा आढावा आज महायुतीच्या शिष्टमंडळाने घेतला. यावेळी सुरक्षा व्यवस्था, बैठक, वाहन पार्किंग आदी बाबत योग्य सूचना संबंधित अधिकाऱ्यांना करण्यात आल्या. या शिष्टमंडळात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आ.धनंजय मुंडे, आ.हसन मुश्रीफ, आ.प्रवीण दरेकर, आ.गुलाबराव पाटील, आ.अनिल भाईदास पाटील, आ.संजय सिरसाट यांसह महायुतीतील घटक पक्षांचे मान्यवर नेते तसेच वरिष्ठ पोलीस अधिकारी आदी दिसत आहेत...*

# शिंदे गृहखात्यावर ठाम, महसूल आणि सार्वजनिक बांधकाम खातंही मागितलं

## शिंदे-फडणवीसांच्या बैठकीत तोडगा नाहीच



**मुंबई । प्रतिनिधी**

महायुती सरकारचा शपथविधी अवघ्या काही तासांवर आला असला तरी मंत्रिमंडळाच्या काही खात्यांवरून मात्र अद्याप तोडगा निघाला नाही. एकनाथ शिंदे यांनी गृहखाते, नगरविकास खात्यासह महसूल आणि सार्वजनिक बांधकाम खातंही शिवसेनेकडे मागितलं असल्याची माहिती आहे.

त्याचवरून भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यातील वर्षा बंगल्यावरील बैठकीत कोणताही तोडगा निघाला नाही. त्यावर बुधवारी पुन्हा एकदा चर्चा होणार असून अंतिम तोडगा निघण्याची शक्यता आहे.

भाजपला मुख्यमंत्रिपद दिल्यानंतर आता एकनाथ शिंदे हे शिवसेनेला गृहखातं आणि नगरविकास खातं मिळावं अशी मागणी करत आहेत. त्याचसोबत महसूल खातं आणि सार्वजनिक बांधकाम खातंही शिवसेनेकडे राहावं यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

### देवेंद्र फडणवीस आणि शिंदेंच्या बैठकीत तोडगा नाहीच

गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदे हे आजारी असल्याने महायुतीची कोणतीही बैठक होऊ शकली नाही. त्याचमुळे मंत्रिमंडळातील कोणती खाती कुठल्या पक्षाला याचा निर्णयही झाला नाही. आता एकनाथ शिंदे यांची तब्येत ठिक आहे. त्याचमुळे यावर तोडगा काढण्यासाठी भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस हे स्वतः शिंदेंच्या भेटीला वर्षा बंगल्यावर गेले. या दोन नेत्यांमध्ये जवळपास दीड तास चर्चा झाल्याची माहिती आहे. पण गृहखात्यावर मात्र तोडगा निघाला नाही. गृह खाते, नगरविकास खाते शिंदेंकडे जाणार की ही खाती भाजपकडेच राहणार याचा निर्णय बुधवारी होण्याची शक्यता आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# अंबाजोगाई शहरात दहा लाखांचा गुटखा पकडला!

## एसपींच्या विशेष पथकाचे प्रमुख बाळराजे दराडे यांची कारवाई

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने अंबाजोगाई शहरात गुटख्याच्या गोदामावर मंगळवारी (दि.३) सायंकाळी सातच्या सुमारास धाड मारली. यावेळी १० लाख ६७ हजारांचा गुटखा जप्त करण्यात आला. गणेश बिडवे, किरण रविंद्र शेटे अशी गुटखा व्यापार्यांची नावे आहेत. त्यांनी अंबाजोगाई शहरातील गणेश प्रोव्हिजनच्या गोदामात गुटख्याचा साठा करुन ठेवला होता.

▶▶ उर्वरित पान २ वर



याची माहिती पोलीस




# बाटलीबंद पाणी आरोग्यासाठी अतिधोकादायक यादीत; खाद्य सुरक्षा विभागाचा मोठा निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान आपण बऱ्याचदा बाटलीबंद पाणी खरेदी करतो. घराबाहेर पडताना घरातील पाण्याची बाटली विसरून निघालो तर बाहेर पाण्याची बाटली खरेदी करतो. या बाटलीबंद पाण्याला 'मिनरल वॉटर' किंवा 'पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर' असं संबोधलं जातं. हे पाणी शुद्ध आहे असं आपण म ानतो. काही कंपन्या दावा करतात की त्यांनी यात मिनरल्स (नैसर्गिक द्रव्ययुक्त पाणी) मिसळले आहेत. या पाण्याने आपल्याला कुठल्याही प्रकारचं नुकसान होत नाही, असं आपण मानतो. अनेक घरांमध्ये पिण्यासाठी, जेवण बनवण्यासाठी

▶▶ उर्वरित पान २ वर



# एका बाजूला थंडीचा कडाका, दुसऱ्या बाजुला पावसाची हजेरी, वातावरणातील बदलाचा शेती पिकांना फटका




राज्यात सध्या वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं थंडीचा कडाका जाणवत आहे, तर कुठं पावसाची हजेरी लागत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मात्र, या बदलत्या वातावरणामुळं राज्यातील शेतकरी मात्र, चिंतेत आहेत. या वातावरणातील बदलाचा शेती पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे. परभणी शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात जोरदार पावसानं हजेरी लावली. या पावसामुळं रब्बी पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जातेय.

रब्बी पिकांचे नुकसान होण्याची भीती– हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार परभणी शहरासह जिल्ह्यातील काही भागात पावसाने हजेरी लावली. जवळपास १५ मिनिटांपासून हा पाऊस सुरु आहे. गेल्या दोन दिवसापासून शहरासह जिल्हाभरात होतं ढगाळ वातावरण होत आहे. आज ५ वाजण्याच्या सुमारास परभणी शहरासह काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसतोय. या पावसामुळं वातावरणात गारवा वाढण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे रब्बी पिकांचे नुकसान होण्याची भीतीही निर्माण झाली आहे. त्यामुळं राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत.

तळ कोकण व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना पुढील ३ दिवस पावसाची शक्यता– भारतीय हवामान केंद्राच्या प्रादेशिक केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार, तळ कोकण व मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना पुढील ३ दिवस हलक्या ते मध्यम सरींच्या पावसाची शक्यता आहे. बंगालच्या उपसागरात आलेल्या फेंगल चक्रीवादळाचा हा परिणाम असल्याचं सांगण्यात येत आहे. मंगळवार ३ डिसेंबरला तळकोकणातील सिंधूदुर्ग, कोल्हापूर जिल्ह्याला यलो अलर्ट देण्यात आला असून बुधवारी सिंधूदुर्ग, रत्नागिरी, सातारा, कोल्हापुरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सोलापूर, सांगली, तसेच मराठवाड्यातील धाराशिव, लातूर नांदेड जिल्ह्यातही हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचा पट्टा आता वायव्येकडे सरकत असल्यानं महाराष्ट्रात सध्या असणारी कडाक्याची थंडी ओसरणार असून तापमानाचा टक्का वाढणार आहे. वातावरण दमट व ढगाळ राहणार असून कोकण, मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात हलक्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. 'फेंगल' चक्रीवादळाने तमिळनाडूच्या किनारपट्टीला धडक दिल्यानंतर पुद्दुचेरी, कुड्डालोर आणि विल्लुपूरम् यांच्या शेजारी भागात अल्प दाबाचे क्षेत्र निर्माण झाले. हे चक्रीवादळ हळूहळू पश्चिमेकडे सरकेल आणि नंतर त्याची तीव्रता न्यून होईल, अशी माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली होती.

# आता एका बँक खात्यात ४ नॉमिनी जोडता येणार, बँकिंग दुरुस्ती विधेयक २०२४ लोकसभेत मंजूर



बँकिंग कायदा दुरुस्ती विधेयक ३ डिसेंबर रोजी लोकसभेत मंजूर करण्यात आलंय. या विधेयकानुसार आता एका बँक खात्यात चार नॉमिनी जोडण्याची तरतूद आहे. यासोबतच नवीन बँकिंग कायदा विधेयकात ठेवीदारांचे संरक्षण आणि खाजगी बँकांमध्ये चांगली सेवा देण्याच्या तरतुदी आहेत.

हे गुंतवणूकदारांच्या हिताचे रक्षण करेल आणि हस्तांतरण आणि परतावा क्लेम सुविधा प्रदान करेल. विधेयकातील बँक संचालकांसाठी भरीव व्याज पुनर्परिभाषित करणे देखील समाविष्ट आहे. विधेयकात ही मर्यादा ५ लाख रुपयांवरून २ कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याची तरतूद आहे. हा आकडा जवळपास सहा दशकांपासून कायम आहे. बँकिंग कायदा दुरुस्ती विधेयकात हे मोठे बदल कोविड १९ महामारीमुळे उद्भवलेल्या समस्यांनंतर बँकिंग कायदा दुरुस्ती विधेयकात हे मोठे बदल करण्यात आले आहेत. महत्त्वाचे म्हणजे आता एका नॉमिनीऐवजी चार नॉमिनी जोडण्याची परवानगी दिली जाणार आहे. खातेदाराचा मृत्यू झाला तर त्यांच्या वारसांना पैसे काढणे सोपे व्हावे हा त्याचा उद्देश आहे. हे विधेयक ठेवीदारांना एकरकमी नामांकन निवडण्याची परवानगी देते. यामध्ये व्यक्तीला शेअर्सची निश्चित टक्केवारी नियुक्त केली जाते, किंवा अनुक्रमिक नामनिर्देशन, जिथे बँकेत जमा केलेली रक्कम नामनिर्देशित व्यक्तीच्या वयानुसार दिली जाते. या बदलामुळे कुटुंबांसाठी निधीचा प्रवेश सुलभ होईल आणि बँकिंग प्रक्रियेतील विलंब कमी होईल अशी अपेक्षा आहे.

बँकांना मिळणार मोठा दिलासा– हे विधेयक मंजूर झाल्यानंतर बँकांना देखील मोठा दिलासा मिळणार आहे. त्यांना आता दर शुक्रवारी ऐवजी दर पंधरवड्याच्या शेवटच्या दिवशी रिझर्व्ह बँकेला अहवाल सादर करता येईल. यासोबतच नॉन–नोटीफाईड बँकांना उर्वरित रोकड राखून ठेवावी लागेल. मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकाला राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर काम करण्याची परवानगी देण्याची तरतूद विधेयकात आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सांगितले की, या विधेयकात आणखी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. आत्तापर्यंत, सात वर्षांपर्यंत खात्यात कोणताही व्यवहार नसल्यास, तो गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीकडे पाठविला जात होता. या दुरुस्तीनंतर, खातेदार गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधीमधून रक्कम परत करण्याचा दावा करू शकतो.

## श्री दत्तात्रय भगवान प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे ध्वजारोहण संपन्न परिसर चैतन्यमयी; हजारो भाविकांची मांदियाळी



**परळी वैजनाथ ।** प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील सारडगाव येथील श्री क्षेत्र दत्तधाम आध्यात्मिक उन्नती केंद्र, गोपाळपुरा येथे विद्यावाचस्पती ह.भ.प. डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित श्री दत्तात्रय भगवान (त्रिमुखी) प्राणप्रतिष्ठा सोहळा, दत्तयाग, व चार दिवसीय कीर्तन महोत्सव भक्तिमय वातावरणात सुरू आहे.

सोमवार, दि. २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता, ह.भ.प. केशव महाराज उखळीकर, परमेश्वर गिरी महाराज, आणि ह.भ.प. नवनाथ महाराज यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला. ध्वजारोहणाच्या वेळी उपस्थित मान्यवर आणि भाविकांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. ध्वजारोहणानंतर, भगवान दत्तात्रय त्रिमुखी मूर्तीची भव्य मिरवणूक सारडगाव गावातून काढण्यात आली. टाळ–मृदंगाचा गजर, भक्तांच्या जय दत्त नामघोष, आणि संत मंडळ्यांच्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. मूर्तीची यात्रा गावप्रदक्षिणेसह पार पडली, जिथे पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. स्वामी डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज यांचे नाशिक, उज्जैन, आणि अन्य धार्मिक स्थळांवरील भव्य सोहळ्यांच्या आयोजनातील कौशल्य या कार्यक्रमातही दिसून आले. नाशिक शहरात मागील पंधरा वर्षापासून महाराज भव्य दिव्य संजीवन समाधी सोहळ्याचा आयोजन करतात, तसेच जळगाव येथेही विश्वनाथ महाराज शास्त्री यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. महाराजांच्या या नियोजन कौशल्यामुळे या कार्यक्रमास कुंभमेळ्याची प्रचिती आल्याचे भाविकांमधून प्रतिक्रिया येत आहे

भाविकांसाठी हा सोहळा श्रद्धा, भक्ती, आणि अध्यात्मिक उन्नतीचा महोत्सव असून भाविकांनी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १/४ वरून पुढे.....

## बालाघाटावरील सुलतानपूर...

दाखल न करता समज देऊन सोडण्यात आले आहे. असे सपोनी चंद्रकांत गोसावी यांनी सांगितले.

### पोलिस प्रशासन पवनचक्की कंपन्यांच्या संरक्षणासाठी सर्वात पुढे पिडीत शेतकऱ्यांची जबाबदारी कोणाची ? ? : डॉ.गणेश ढवळे

पवनचक्की कंपन्यांनी बालाघाटावर गेल्या २ वर्षांपासून उच्छाद मांडला असुन शेतकऱ्यांच्या अडाणी पणाचा फायदा घेऊन स्थानिक व बाहेरील गुंड बाळगुन आर्थिक लुट सुरू असुन पोलिस प्रशासनाला हाताशी धरून मनमानी कारभार करत आहेत. बालाघाटावरील शेतकरी पवनचक्की कंपन्यांच्या दहशतीखाली असुन पोलिस प्रशासन कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली कंपन्यांपुढे लोटांगण घालत असुन शेतकऱ्यांवर दडपशाही करत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मग नेमका प्रश्न पडतो पोलिस प्रशासन शेतकऱ्यांसाठी काम करतंय की पवनचक्की कंपन्यांसाठी असा प्रश्न उपस्थित करत मग पिडीत शेतकऱ्यांना न्याय देण्याची जबाबदारी कोणाची ? ? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विचारला आहे.

## मराठी पत्रकार परिषद...

जवळपास १ हजारांच्या वर या शिबिरात रक्तदात्यांनी रक्तदान व आरोग्याची तपासणी केल्या बद्दल एस एम देशमुख यांनी मानले आभार. आहे.

यावेळी मराठी पत्रकार परिषद चे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख सर, बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात,मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख संजय हंगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी उबाळे, बीड तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक

अभिमान्यु घरत,तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, अशोक खाडे,अनिल जाधव आदींनी उपस्थिती होती.

पत्रकारांचे आरोग्य शिबीर सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत पार पडले यात बीड जिल्हा रुग्णालयाच्या तज्ञ डॉक्टरांनी सर्व पत्रकार बांधवांच्या तपासण्या केल्या यात डॉ.शहाणे,डॉ. पारखे, डॉ. काळे, डॉ.राऊत, व रक्त संक्रमण अधिकारी डॉ. कट्टे मॅडम,डॉ.नाईकवाडे मॅडम,डॉ.रोहिणी सवासे मॅडम तसेच रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी श्रीमती गालफाडे, रक्तपेढी तंत्रज्ञ सचिन स्त्कर, विनोद रावतळे, विनय कुंभार, सेवक दिलीप औसरमल या खूप मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले

### या शिबीराचा बीड तालुक्यातील सर्व पत्रकार आणि त्यांच्या कुटूंबीयांनी लाभ घेतला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या मार्गदशनाखाली संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा परिषदे प्रमुख संजय हंगे ,जिल्हा उपाधयक्ष रवी उबाळे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यु घरत, संपादक राजेंद्र होळकर, हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, बीड तालुकाध्यक्ष दत्ता आजबे, कार्याध्यक्ष रेहान शेख, कोषाध्यक्ष प्रशांत लहुरीकर, सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींनी परिश्रम घेतले.

## शिंदे गृहखात्यावर...

### महायुतीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहरा ठरणार

महायुती सरकारच्या मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बुधवारी सकाळी जाहीर होणार आहे. भाजपच्या विधिमंडळ गटनेत्याची निवड झाल्यानंतर, बुधवारी दुपारी महायुती सरकार स्थापनेचा दावा करणार आहे. त्यानंतर बुधवारी दुपारी साडेतीन वाजता महायुतीचे नेते राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना भेटून तिन्ही नेते सरकार स्थापनेचं पत्र राज्यपालांकडे सोपवणार आहेत.

### ११ मंत्रिपदं द्या, अजितदादांची मागणी

शपथविधीला दोन दिवसांपेक्षाही कमी अवधी बाकी असताना राष्ट्रवादी काँग्रेस भाजप नेते आणि गृहमंत्री अमित शाहांकडे ११ मंत्रिपदाची मागणी करणार असल्याची माहिती आहे. राष्ट्रवादीला राज्य सरकारमध्ये ७ कॅबिनेट आणि २ राज्यमंत्री पदं हवी असल्याची सूत्रांची माहिती आहे. याशिवाय प्रफुल पटेलांसाठी केंद्र सरकारमध्ये एक कॅबिनेट पद, तसंच पक्षातील वरिष्ठ नेत्यासाठी राज्यपाल पदाचीही राष्ट्रवादीची मागणी असल्याचं विश्वसनीय सूत्रांनी सांगितलंय.

## अंबाजोगाई शहरात...

अधीक्षक यांच्या विशेष पथकाचे प्रमुख बाळराजे दराडे यांना मिळाली. त्यांनी पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या आदेशाने या गोदामावर धाड टाकली. यावेळी रजनीगंधा, आरएमडी, विमल, गोवा, बाबा या कंपीनचा १० लाख ६७ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख सहायक निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक घाडगे, यांनी केली. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

## बाटलीबंद पाणी ....

हेच पाणी विकत घेऊन वापरलं जातं. परंतु, बाटलीबंद पाणी पिन्यांसाठी आणि हे पाणी विकणाऱ्या कंपन्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने (FSSI) म्हटलं आहे की हे पाणी आपल्यासाठी घातक ठरू शकतं. एफएसएसआयने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटरचा अतिधोकादायक खाद्यपदार्थांच्या श्रेणीत वर्गीकरण केलं आहे. त्यामुळे आता या पाण्याची तपासणी करणं अनिवार्य आहे. तसेच या पाण्याचं व ते पाणी विकणाऱ्या कंपन्यांचं ऑडिटही (तपाणसी) केलं जाणार आहे.

अलीकडेच केंद्र सरकारने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उद्योगासाठी ब्युरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड्सकडून (बीआयएस) दिलं जाणारं प्रमाणपत्र मिळवण्याची अनिवार्य अट रद्द केली आहे. त्यानंतर एफएसएसआयने हा नवीन निर्णय घेतला आहे. हा निर्णय पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर विक्रेत्या कंपन्यांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. एफएसएसआयने जाहीर केलेल्या नव्या नियमांनुसार आता सर्व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उत्पादकांना एफएसएसआयच्या वार्षिक तपासण्यांना (ऑडिट) सामोरं जावं लागेल. कोणत्याही कंपनीला परवाना मिळवण्यापूर्वी किंवा नोंदणी करण्यापूर्वी ही तपासणी करून घ्यावी लागेल.

### कंपन्यांना तपासण्या करून घ्याव्या लागणार

एफएसएसआयने दिलेल्या आदेशांनुसार सर्व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उत्पादनांना अतिधोकादायक खाद्यपदार्थांच्या श्रेणीत वर्गीकृत केलं आहे. तसेच या उत्पादकांना आता एफएसएसआयचं प्रमाणपत्र घ्यावं लागेल. त्याचबरोबर थर्ड पार्टी अन्न सुरक्षा संस्थांकडून वार्षिक ऑडिट करून घ्यावं लागेल.

### या निर्णयाचा सर्वसामान्यांवर काय परिणाम होणार ?

हा सर्व खटाटोप करण्यामागे सरकारचं एकमेव उद्दीष्ट आहे की सर्वांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावं, लोकांनी खरोखर मिनरल वॉटर मिळावं. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या उत्पादनांची सुरक्षा व दर्जा सुधारणं हे सरकारचं उद्दीष्ट आहे. लोकांना सुरक्षित गोष्टी मिळाव्यात व त्यांचं आरोग्य चांगलं राहावं या उद्देशाने सरकारने हे नवे बदल केले आहेत.

## आई-वडिलांची सेवा...

विद्यार्थ्यांसाठी अत्यंत चांगले शैक्षणिक वातावरण आणि येथे रुग्णास दर्जेदार सुविधा मिळत असल्याचे पाहून मला येथे आल्याचा आनंद झाला आहे. आरोग्य क्षेत्रात नर्स (अधिपरिचारिका) यांचा मोलाचा वाटा आहे. भविष्यात शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी करण्याकरिता अनेक संधी आहेत. या संधी आपण सेवा म्हणून कराव्या असे आवाहन जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. सत्येंद्र डबडगावकर यांनी विद्यार्थ्यांना केली.

## बीड बस स्थानक...

विजय जाधवर आणि त्यांच्या टीमने बीड शहरातील बस स्थानक परिसर, बस स्टॅन्ड परिसर, साठे चौक, संतोषी माता टॉकीज, शाहूनगर डीपी रोड, राजीव गांधी चौक आदी परिसरातील रोडवरील अतिक्रमणे हटवली. या मोहीमेत वाहतूक शाखेचे प्रभारी सुभाष सानप, फौजदार विजय जाधवर, वासुदेव मिसाळ पोलीस जमादार पांडुरंग दराडे, सचिन क्षीरसागर, राजाभाऊ तांदळे ,पोलीस अंमलदार अनिकेत घुले, वसीम शेख नगरपालिका अतिक्रमण पथकाचे प्रमुख मुन्ना गायकवाड. त्यांचे सहकारी राम रोकडे, सुजित जाधव, जावेद खान, पवन लाहोट इत्यादींनी सहभाग नोंदवला.

## अभिजीत पवार...

आत्तापर्यंत पत्रकारिता क्षेत्रात विविध प्रकारचे लेखन करून व सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घेऊन केलेल्या कार्याची दखल वरील संस्थेने घेऊन त्यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त प्राप्त झाल्याबद्दल बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बंधू आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून कडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## नेकनूर येथील...

शुभेच्छा देऊन त्यांचे कौतुक केले..या वेळी राखुंडे सर, गिराम सर, खरंगुळे मॅडम,रोकडे सर,आणि शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या सहाय्याने हा जागतिक अपंग दिन संपन्न झाला.

## आ. प्रकाश सोळुंके...

मतदारसंघात विकासाची गंगा आणलेली आहे. म्हणून त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी त्यांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन आमदार केले असून पक्षश्रेष्ठीने त्यांना मंत्रीपद देऊन त्यांच्या विकासात्मक कामाचा गौरव करावा अशी मागणी युवा नेते विश्वास शिनगारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# 6 लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांचा खरीप अग्रीम 2024 रखडला : धनंजय गुंदेकर

## जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन लवकरात लवकर मंजुरी द्यावी ; निवेदनाद्वारे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात खरीप २०२४ मध्ये अतिवृष्टी व सततच्या पावसाने अनेक मंडळांमध्ये शेती पिकांचे अतोनात नुकसान झालेले होते. नुकसान भरपाई सर्व्हे करून याबाबत अहवाल देखील सबंधित विभागांनी शासन स्तरावर पाठवलेला आहे मात्र असे असताना अग्रिम पीकविमा संबंधी काहीही हालचाली शासनाकडून होत नसून मोठ्या प्रमाणात नुकसान आलेल्या मंडळांमध्ये सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, हरभरा, कांदा व इतर सर्व पिकाचा अग्रिम मंजूर करणे आवश्यक आहे. ६



लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांचा खरीप अग्रीम २०२४ रखडला असून जिल्हाधिकाऱ्यांनी बैठक घेऊन लवकरात लवकर मंजुरी द्यावी, अशी मागणी धनंजय गुंदेकर यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील अनेक व बीड तालुक्यातील सर्वच मंडळांमध्ये खरीप हंगामात अनेकवेळा अतिवृष्टी झालेली आहे. या सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणात झालेले आहे. पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यासंदर्भात अहवाल देखील देण्यात आलेला आहे ज्यात लाखो शेतकऱ्यांचा समावेश आहे. मात्र पीकविमा भरलेल्या शेतकऱ्यांना अग्रिम पीकविमा देखील नुकसानीचे प्रमाण अधिक असल्याने यावर्षी मिळायला हवा होता. ६ लाखांपेक्षा अधिक शेतकरी अग्रीम पिकविम्यास पात्र ठरलेले असू शकतात. शेतकरी अग्रीम पीकविमा रकमेकडे अपेक्षा लावून बसलेले आहेत मात्र आधी आचारसंहिता अन आता निवडणूका संपूनही कसल्याही हालचाली सुरू नसून तत्काळ आपण बैठक घेऊन नुकसानग्रस्त मंडळात अग्रिम पीकविमा मंजूर करावा अशी मागणी शेतकरी पुत्र तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे..

---

### महत्वाचे

## निवृत्ती वेतनधारकांना आयकर कपात, हयातनामाबाबत कोषागार कार्यालयाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

ज्या निवृत्ती वेतनधारक यांना आयकर भरावा लागतो. परंतु त्यांचे अर्ज बचतीसह जिल्हा कोषागार कार्यालयात विहित मुदतीत प्राप्त होणार नाहीत, अशा निवृत्ती वेतनधारकाचा आयकर जिल्हा कोषागार कार्यालयात आयकर नियमावलीनुसार कपात करण्यात येईल. त्यामुळे बचतीचे विवरण पत्र, पॅन कार्ड, मोबाईल क्रमांक कोषागार कार्यालयास ३१/१२/२०२४ पर्यंत सादर करावे. तसेच सन २०२४-२५ च्या हयातनाम्यासाठी ज्या बँकेत निवृत्ती वेतन घेत आहेत, त्या शाखेत जाऊन माहे नोव्हेंबर २०२४ अखेर सही, अंगठा केला नसेल, अशा निवृत्ती वेतनधारकांनी कोषागारात १५/१२/२०२४ पर्यंत न चुकता हयातनामा जमा करावा, असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी ल. पां. गळगुंडे यांनी केले आहे.

## डॉ.सतिष लड्डा यांना दिव्यांग भूषण पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना धाराशिव यांच्या वतीने दरवर्षी दिव्यांग क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यामध्ये बीड येथील प्रसिध्द होमिओपॅथीक तज्ञ डॉ.सतिष लड्डा यांना दिव्यांग भुषण पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. सदरील पुरस्कार मंगळवारी दि.३ डिसेंबर रोजी धाराशिव येथे जिल्हाधिकारी डॉ.मैनाक घोष यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी खा.ओमराजे निंबाळकर, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, संघटनेचे जिल्हाध्यक्ष महादेव शिंदे पाटील, विभागीय उपाध्यक्ष सुधीर काळे, राज्य संचालिका अंजना पापडे यांच्यासह जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागाचे विविध अधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते. मागील तीस वर्षांपासून होमि ओपॅथी उपचार पद्धतीद्वारे हजारो रुग्ण बरे केलेले डॉ लड्डा हे स्वतः दिव्यांग आहेत आणि महाराष्ट्रातील हजारो दिव्यांगजन यांना त्यांच्या दैनंदिन अडचणीत तत्पर मदत करतात त्यांच्या दिव्यांग हिताच्या कार्यामुळे अनेक दिव्यांगजन यांच्या रोजच्या अडचणी सुटण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.

## श्री दत्त जयंती निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील सुभाष रोडवरील श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थानमध्ये दरवर्षीप्रम ाणे श्रीदत्त जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्रीमद् भागवत कथा, श्रीगीता जयंती, दत्त जन्मोत्सव, दीपोत्सव आणि संगीत भक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या जन्मोत्सव सोहळ्याचे आणि धार्मिक कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्रीदत्त मंदिर संस्थान तर्फे करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दत्त मंदिरामध्ये दि. ९ डिसेंबर ते १५ डिसेंबर दरम्यान वेशास श्री अनंत शास्त्री मुळे यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे.दुपारी दोन ते पाच या वेळेमध्ये भागवत कथा होईल. त्यानंतर गुरुचरित्राचे पारायण सोमवार दि.९ डिसेंबर पासून सकाळी नऊ ते अकरा या वेळेत होणार आहे.श्रीगीता जयंतीचे आयोजन ११ डिसेंबर रोजी करण्यात आले असून याच दरम्यान भव्य दीपोत्सवाचे आयोजन १३ डिसेंबर रोजी सायंकाळी करण्यात आले आहे.

---

### पत्रकारांच्या परिवाराबद्दल खा.बजरंग सोनावणेंच्या आक्षेपार्ह वक्तव्य प्रकरणी

## राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड जयंत पाटील यांना तक्रार : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे खा.बजरंग सोनावणे यांनी बीडचे नवनिर्वाचित आ.संदिप क्षीरसागर यांच्या बीड करांच्या वतीने नागरी सत्कार सभेत पत्रकारांची बायको,त्यांची मुलं काढुन आपल्यातील असभ्यतेचे दर्शन घडवत पत्रकारांच्या कुटुबियांचा अवमान केला असुन महिलांचा सन्मान करणा-या आणि महिला कार्याध्यक्ष असलेल्या पक्षाचे वरिष्ठ नेते संस्थापक,राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, कार्याध्यक्ष तथा लोकसभेच्या नेत्या सुप्रिया सुळे, पक्षाचे सचिव जितेंद्र आव्हाड, सरचिटणीस जयंत पाटील यांना सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी ईमेल द्वारे तक्रार करत खा.बजरंग सोनावणे यांना समज देऊन पत्रकारांची माफी मागायला लावावी अशी मागणी केली आहे.

दैनिक लोकमत सारख्या नामांकित दैनिकात दि.२७ नोव्हेंबर रोजीच्या अंकात केज विधानसभेच्या निकालावरून खा.बजरंग सोनावणे यांच्या भुमिकेवर संशय व्यक्त करणारी बातमी प्रसिद्ध केली होती.या बातमीच्या अनुषंगाने खा.बजरंग सोनावणे



यांनी बीडमध्ये आ.संदिप क्षीरसागर हे दुसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यानंतर त्यांचा जाहीर नागरी सत्काराच्या कार्यक्रमात बोलताना सोनावणे म्हणाले संशय तुझ्या बायकोला आला? पोराला आला? का अन्य कुणाला आला? कारण बजरंग सोनावणे केजमध्ये फॉर्म भरायला नव्हते म्हणून त्या पत्रकाराला संशय आला असे म्हणत एवढ्यावरच न थांबता सगळे पत्रकार सत्तेच्या बाजुने आहेत असा शिक्काही सोनावणे यांनी पत्रकारांना मारला वरतुन सत्य लिहा असा उपदेशही केला. त्यामुळे पक्षाच्या वरीष्ठ नेत्यांनी खा.बजरंग सोनावणे यांना समज देऊन पत्रकारांची जाहीर माफी मागायला लावावी अशी मागणी करण्यात आली आहे.

पत्रकारिता लोकसभेचा चौथा आधारस्तंभ असल्याचा बजरंग सोनावणेंनी जावई शोध लावला जाहीर कार्यक्रमात पत्रकारांच्या कुटुंबियांचा केवळ आक्षेपार्ह भाषेत अवमान करूनच खा.बजरंग सोनावणे थांबले नाहीत तर त्यांनी पत्रकार हे लोकसभेचा चौथा आधारस्तंभ आहेत असा जावई शोध लावला आहे. त्यांच्या या वक्तव्याची जिल्हाभर चांगलीच चर्चा रंगली असुन त्यांच्या विरोधात केवळ पत्रकारच नव्हे तर सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्यांतुन सोशल मीडियावर टीकेची झोड उठवली जात असुन त्यांनी पत्रकारांची तातडीने माफी मागुन हा विषय संपवावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## महिला कला महाविद्यालयात जागतिक एड्स दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

येथील माऊली विद्यापीठ संचलित महिला कला महाविद्यालय बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक एड्स दिन ०२ डिसेंबर २०२४ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर या होत्या तर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे यांची विचार मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे यांनी जागतिक एड्स दिन प्रसंगी हा दिन साजरा करण्यामागची पोर्शभूमी सांगितली व एडस ची लक्षणे उपाय याविषयी माहिती दिली. अध्यक्ष समारोप प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.संध्या आयस्कर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले

---

## सर्वांना सामावून घेणारी भारतीय संस्कृती वैभवशाली : महंत राधाताई महाराज सानप

### श्री दत्तात्रय भगवान भव्य प्राणप्रतिष्ठा व दत्तयाग महोत्सवास सुरुवात ; विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

भारतीय संस्कृती ही जगात सर्वश्रेष्ठ आहे. त्याच प्रमाणे सनातन हिंदू धर्म हा देखील सर्वांना सामावून घेत विश्वबंधुत्वाची साक्ष देणारा व साद घालणारा आहे. आपण या हिंदुस्थानच्या पवित्र भूमीत जन्म घेतला हे आपले भाग्य असून आपल्या थोर संस्कृतीची जपवणूक करणे हे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे, असे प्रतिपादन महंत राधाताई महाराज यांनी तालुक्यातील गोपाळपुरा, सारडगाव येथे सुरू असलेल्या श्री दत्तात्रय भगवान (त्रिमूर्ती) भव्य प्राणप्रतिष्ठा सोहळा व चार दिवसीय कीर्तन महोत्सवाच्या दुसऱ्या पुष्पात बोलताना केले.

संत साहित्याचे अभ्यासक विद्यावाचस्पती डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या भव्यदिव्य महोत्सवाच्या दुसऱ्या पुष्पात मंगळवार, दि. ३ डिसेंबर रोजी सकाळी ७ ते १२ या वेळेत प्रायश्चित्त संकल्प, देवता वहन व वास्तुमंडल पूजा, दुपारी २ ते ४ या वेळेत मूर्तीस जलाधिवास तसेच दुपारी ३ ते ५ या वेळेत महंत ह.भ.प. राधाताई सानप आईसाहेब यांचे कीर्तन तर सायंकाळी ५ ते ७ या वेळेत मंगलाचरण, नवग्रह स्थापना, देवता स्थापना आणि मूर्तीस पुष्पाधिवास करण्यात आला. सायंकाळी ७ वाजता आरती व प्रसाद व त्यानंतर ७ ते ८ या वेळेत स्वररत्न संगीत मैफिल प्रस्तुत महाराष्ट्राचा महागायाक पुरस्कार प्राप्त सुप्रसिद्ध गायक सुभाष शेप व गायिका मयुरी मजगे यांची भजनसंध्या संपन्न झाली. यावेळी सौ मंजलीताई वाल्मीक कराड, मा.सभापती सूर्यभान नाना मुंडे, सरपंच बंडू गुट्टे, दत्तात्रय गुट्टे, सरपंच सुनील गुट्टे, सरपंच राजेभाऊ आघाव, माधव मुंडे, संजय अघाव, संदीपान तांदळे, नीळकंठ दराडे, राम बोबडे, सोमनाथ वायभसे मंगेश फड यांच्यासह सारडगाव व नंदनंज पंचक्रोशीतील भाविक` उपस्थित होते.

---

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस.एस.पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १७३२/२०२४**

**ॲड. एस. बी. शिंदे यांच्या मार्फत**

**किसन माणिक काळे वि. निरंक**

अर्जदार- किसन पि. माणिक काळे, वय - ४८ वर्षे, धंदा - शेती, रा. नेकनूर ता. जि. बीड

गैरअर्जदार - निरंक

प्रकरणः भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत **माणिक पि. रामराव काळे** यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत **माणिक पि. रामराव काळे हे दिनांक ०२/११/२०२४ रोजी नेकनूर ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार हाच फक्त मयताचा एकमेव कायदेशीर वारस आहे. मयताची पत्नी नामे मोहरबाई भ्र.माणिक काळे हया बऱ्याच वर्षापूर्वी मयत झाल्या आहेत. तसेच मयत माणिक यांचे आई-वडील देखील बऱ्याच वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. यांच्या शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की. शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे माणिक पि. रामराव काळे या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे माणिक पि. रामराव काळे, रा. नेकनूर ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वानी नोंद घ्यावी.

**पुढील तारीख ०२/०१/२०२५.**

आज दिनांक ०३/१२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरुन.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## जाहीर प्रगटन

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १७१९/ २०२४**

**ॲड. अभिजीत चौरे यांच्या मार्फत**

**रेखा अशोक खाकरे व ईतर विरूध्द निरंक**

अर्जदार - १. रेखा भ्र. अशोक खाकरे, वय ५२ वर्षे, धंदा - घरकाम, २. अशोक पि. पांडुरंग खाकरे, वय ५५ वर्षे, धंदा - शेती, दोघे रा. वाकनाथपुर, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **शिवराज पि. अशोक खाकरे,** यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांचा मृत्यु दिनांक १८/०८/२०२४ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत शिवराज पि. अशोक खाकरे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०२/१२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले. **सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. ०७/०१/२०२५ आहे.**

**आदेशावरून.**

शिक्का

(स्वाक्षरीत) क.लिपीक

(स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

---

## समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मतभेद विसरून एकजूट होण्याची गरज

### श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची समाजबांधवांना साद ; तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या जयंती सोहळ्याला प्रतिसाद

**माजलगाव । प्रतिनिधी**

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाज बांधवांनी आपसाआपसांतील सर्व मतभेद विसरून एकजूट करण्याची गरज आहे, समाजासमोर नवा आदर्श प्रस्थापित करावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे. दरम्यान, सोमवारी श्री संस्थान मठ माजलगाव येथे लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंतीनिमित्त सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला समाज बांधवांनी मोठा प्रतिसाद दिला.

लिंगैक्य तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंती निमित्ताने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली वीरशैव समाजातील सर्व लिंगायत व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा मोठ्या थाटात



संपन्न झाला. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा तृतीय जयंतीनिमित्त विविध धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पुढे बोलताना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज आपल्या आशीर्वचनात म्हणाले, सामाजिक एकोपा टिकवून ठेवण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी वीरशैव लिंगायत समाजाने इतर समाजाच्या तुलनेत आदर्श निर्माण करावा जेणेकरून समाजाचे हित होईल, असे आवाहन मठाधिपती यांनी केले. श्री संस्थान मठात सकाळी ८ वाजता ते १० वाजता लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधीस रूद्राभिषेक, १० वाजता आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन व वधू-वर परिचय मेळावा झाला. वधू-वर परिचय मेळावा यशस्वी करण्यासाठी डॉ. गजाननआप्पा होन्ना, मनोहरअप्पा जामकर, कैलासआप्पा खुर्पे, राजाभाऊआप्पा लोखंडे, सुचेंद्रअप्पा महाजन, नितीनअप्पा शेटे, संजयअप्पा मोगरेकर, विकासआप्पा पाटील, प्रशांतआप्पा शेटे, रामेश्वरआप्पा काटकर, कैलासआप्पा लांडगे, सुरेशआप्पा कुरूळे, गणेश तोडकरी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव पेठकर यांनी केले. तर वधू-वरांचा परिचय प्रा.गजानन होन्ना यांनी उपस्थितांना करून दिला.

### लवकरच सामुहिक विवाह सोहळा आयोजन

**सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने यंदाही भव्य स्वरूपात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील वधू-वर परिचय मेळाव्याचे सोमवारी आयोजन करण्यात आला होते. काळाबरोबर सामाजिक बांधिलकीचा वसा घेत मठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजमितीला समाजाच्या हितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली. दरम्यान, येत्या ३१ डिसेंबरपर्यंत वधू-वरांची नोंदणी करता येईल, लवकरच सामुहिक विवाह सोहळ्याचेही होणार असल्याचे श्री संस्थान मठा माजलगाव तर्फे कळविण्यात आले आहे.**

दैनिक • epaper.marathwadapatra.com
बुधवार, दि.०४ डिसेंबर २०२४ पान ४

# मराठवाडा पत्र

• dailymarathwadapatra2021@gmail.com ■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■ Mo. 9822152955

# आई-वडिलांची सेवा करत राहणे हे आपले कर्तव्य: संचालिका डॉ. आदितीजी सारडा

## आदित्य नर्सिंग कॉलेजमध्ये लॅम्प लाईटनिंग, कर्तव्य शपथ समारंभ उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा आहे. त्याप्रमाणेच आई-वडिलांची सेवा सुद्धा सर्वश्रेष्ठ सेवा आहे. त्यामुळे आपण आपल्या आई-वडिलांना कधीही न विसरता त्यांची सेवा करत राहणे हे आपले कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांनी जीवन जगण्याचा दृष्टिकोन सकारात्मक ठेवावा. शैक्षणिक जीवनामध्ये अध्ययन करताना आपल्या आई-वडिलांचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊन मेहनत घ्यावी यश नक्कीच मिळत राहते. असे मार्गदर्शन वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा यांनी केले.





आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य नर्सिंग कॉलेजमध्ये लॅम्प लाइटनिंग व कर्तव्य शपथ समारंभ सोमवार २ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी डॉ. आदितीजी सारडा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होत्या.

आदित्य नर्सिंग महाविद्यालयात प्रथम वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये अधि परिचारिका (नर्स) म्हणून भूमिका पार पाडत असताना आपले कर्तव्य व निष्ठा याचे भान राहावे याकरिता कर्तव्य शपथ ग्रहण सम रंभाचे आयोजन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्यजी सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदितीजी सारडा, जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. सत्येंद्र डबडगावकर, वरिष्ठ आरोग्य अधिकारी डॉ. रमेश घोमरे, डॉ. हिमांशू श्रीवास्तव, प्रा. श्याम भुतडा, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य प्रा. विकास गर्जे उपस्थित होते.

प्रारंभी सरस्वती प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. आदितीजी सारडा पुढे म्हणाल्या की, आपल्या आई-वडिलांच्या मेहनतीचे, कष्टाचे मोल कसे करता येईल व भविष्याम ध्ये त्यांना ताठ मानेने जगता येईल या दृष्टिकोनातून शैक्षणिक आणि सर्वांगीण विकास घडवून आप-आपल्या जीवनात मोठे यश संपादन करावे. आई-वडिलाचे आणि आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे योगदान सार्थक कसे होईल या दृष्टिकोनातून वाटचाल करावी. भविष्यात नर्स (अधिपरिचारिका) म्हणून रुग्णांना काळजीपूर्वक सुविधा पुराव्यात असे मोलाचे मार्गदर्शन त्यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्थेमध्ये आल्याने आनंद वाटला- जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ. सत्येंद्र डबडगावकर

आदित्य शिक्षण संस्था तसेच आदित्य नर्सिंग महाविद्यालयांमध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर

# बजरंग बाप्पा मारु नका गप्पा

## पत्रकार बांधवांचा आणि त्यांच्या कुटुबीयांचा माया बहिणीचा सन्मान करता येत नसेल तर राजीनामा द्या: ॲड संगीता धसे भाजपा जिल्हा उपअध्यक्षा

**बीड । प्रतिनिधी**

एका सन्मान सोहळ्यात कौतूकाची थाप देण्यात भारावून गेलेले बीडचे खासदार अगदी अटीतटीच्या आणि जातीयवादाच्या धुक्यातून निवडून आलेले खासदार बजरंग बाप्पा सोनवणे आपण एका व्यवस्थेवर कार्य करण्यासाठी निवडून आलेले आहात ..., आपल्याला कसलेच भान नाही, स्वतःच्या अस्तीत्वाची जान नाही मोठ्या सभेच्या भाषणात जाहिरपणे सांगता मी आमदार म्हणून निवडून आलो आहे, ज्यांना स्वतःच्या पदाचा



विसर पडला , एवढेच नव्हे तर खासदार साहेब तुम्हाला लोकशाहीत लोकप्रतिनीधी म्हणून जसा संविधानाने तुम्हाला दर्जा दिलेला आहे तसाच आमच्या पत्रकार बांधवांना सुद्धा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून समाज मान्यता दिली आहे याचा आम्ही महिला भगीणी आपल्याला विसर पडू देणार नाही.., अविर्भावात भाषण करताना आमच्या पत्रकार बांधवाच्या कुटूंबीयावर त्या माया बहिणीना मध्ये घेऊन स्वतःची वाहवा करून स्वतःच्या अस्तीत्वाची जान नसणाऱ्या , वाचाळ सारखी बडबड करून नाकर्तेपणाचे लेबल घेतलेल्या खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी तमाम पत्रकार बांधवाच्या कुटूंबातील माया बहिणीची जाहीर माफी मागावी नसता खासदारकीचा राजीनामा द्यावा.

# सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा १0 डिसेंबर रोजी होणार शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हयाचा सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४-२५ निधी संकलन शुभारंभ मंगळवार, १० डिसेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी तथा जिल्हा ध्वजदिन निधी संकलन समितीचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या उपस्थितीत होणार आहे, असे सेवानिवृत्त स्कवॉड्रन लिडर तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विद्यासागर कोरडे यांनी कळवले आहे. जिल्ह्यातील युद्ध विधवा, माजी सैनिक विधवा, माजी सैनिक त्यांचे अवलंबित आणि शौर्यपदक धारक आणि इतर नागरिक यांनी कार्यक्रमास उपस्थितीत राहावे,




असे आवाहनही त्यांनी केले आहे.या कार्यक्रमामध्ये ध्वजदिन २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांना मान्यवर, जिल्ह्यातील शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

## बीड बस स्थानक परिसरातील अतिक्रमण हटवली;

# जिल्हा वाहतूक शाखेची शहरात कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बस स्थानक परिसर, साठे चौक ,शाहूनगर ,संतोषी माता टॉकीज परीसर, डीपी रोडवरील सर्व अतिक्रमणे हटवण्यात आली. ही कारवाई मंगळवार दिनांक ३ डिसेंबर रोजी नगरपालिका आणि जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने करण्यात आली. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ ,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर , यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेचे स.पो.नि. सुभाष सानप फौजदार ▶▶ उर्वरित पान २ वर

# दिव्यांगांच्या योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार: आदित्य जीवने

**बीड । प्रतिनिधी**

दिव्यांगासाठी विविध शासकीय योजना आहेत. त्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देणार असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी आज केले.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त सामाजिक न्याय भवन येथे मुख्य कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी जीवने बोलत होते. दिव्यांगामध्ये अद्वितीय शक्ती असून त्यामुळे ते जिद्दीने व चिकाटीने यश संपादन करतात, असे प्रमुख वक्ते डॉ. अनिल बारकुल म्हणाले. प्रास्ताविक जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती एस. एन. मेश्राम यांनी








केले. सूत्रसंचालन सुनील भोंडवे यांनी केले. आभार अंकुश नखाते यांनी मानले. कार्यक्रमास दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राजेंद्र लाड, रहीम शेख, खेळाडू ज्योतीराम घुले, आदिनाथ हाडोळे, तत्वशील कांबळे, अशोक तांगडे, शहरातील सर्व दिव्यांग शाळांचे मुख्याध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी आदींची बहुसंख्येने उपस्थिती होती.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त रॅली- जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागामार्फत जागातिक दिव्यांग दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत रॅली काढण्यात आली. रॅलीस जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी हिरवा झेंडा दाखवला. रॅलीत सहभागी सर्व शिक्षक, नागरिक, दिव्यांग विविध शाळेतील विद्यार्थी व विविध दिव्यांग संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होते.

# अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय युवा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहिर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील दैनिक बीड चे संपादक अभिजीत पवार यांना राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव युवा आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा ०५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वा. तालुका शिक्षक संघ पतसंस्था हॉल , ४० बिघा मलकापूर जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आल्याची माहिती माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जि. बुलढाणा संस्थापक अध्यक्ष विवेक सुभाष राजापुरे यांनी दिली आहे. क्षेत्रातील मान्यवरांना राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. तसेच आदर्श पत्रकार पुरस्कार म्हणून बीड जिल्ह्यातील अभिजीत पवार यांना राष्ट्रभक्ती सेवा गौरव आदर्श युवा पत्रकार पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आलेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असून, शेतकऱ्यांसाठी अनेक वेळा मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवलेले अभिजीत पवार आहेत.

बीड चे युवा पत्रकार अभिजीत पवार यांनी आपल्या प्रिंट मीडिया न्यूज पोर्टलच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, आर्थिक, तसेच सर्व स्तरातील बातम्या जनतेपर्यंत पोहोचवण्याचे प्रामाणिक कार्य केले आहे. काही



वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात काम करणारे अभिजीत पवार हे सामाजिक राजकीय याचे भान असलेले पत्रकार असून यांनी आत्तापर्यंत आपल्या लेखणी द्वारे समाजातील विविध घटकातील समस्यावर लिखाण करून न्याय देण्याचा प्रयत्न केला करत आहेत अशा तरुण पत्रकार्याच्या कार्याची दखल घेऊन या माणुसकी मल्टीपर्पज फाउंडेशन मलकापूर जि. बुलढाणा यांनी राज्यस्तरीय राष्ट्रभक्ती सेवा गौरव पुरस्कारासाठी निवड केली आहे.

अभिजीत पवार यांनी बीड जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर आपल्या लेखणी द्वारे वस्तुनिष्ठ लिखाण करून सामाजिक कार्यास न्याय देण्याचा प्रयत्न केला अशा या तरुण पत्रकाराचा गौरव राज्यस्तरीय पुरस्काराने होत आहे. हे अभिम ानाची गोष्ट आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# नेकनूर येथील मूकबधिर शाळेत जागतिक दिव्यांग दिन साजरा

**नेकनुर । प्रतिनिधी**

३ डिसेंबर वार मंगळवार रोजी नेकनुर येथील मूकबधिर निवासी शाळेत जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. समाजात जनजागृती व्हावी व दिव्यांग विद्यार्थ्यांची मते समाजापर्यंत पोहोचली पाहिजे या हेतूने तीन डिसेंबर वार मंगळवार रोजी सकाळी जनजागृतीपर रॅली काढण्यात आली. त्यानंतर दिव्यांगाचे आराध्य दैवत डॉक्टर हेलन केलर यांच्या प्रतिमेची पूजन करून कार्यक्रमाचे सुरुवात करण्यात आली. दिव्यांग बांधवांना



RPWD ct नुसार २०१६ मध्ये त्यांच्यासाठी जे बदल करण्यात आले आहेत ते जनसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. दिव्यांगाना दिल्या जाणाऱ्या सुविधा ह्या त्यांना मिळवून देण्यासाठी आपण समाजातील सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन मूकबधिर शाळेचे मुख्याध्यापक श्री लुचारे सर यांनी केले. दिव्यांगाना फक्त सहानुभूती न देता त्यांचे अधिकार त्यांना दिले पाहिजेत. ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनानिमित्त शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या रांगोळी स्पर्धा, गोळा फेक, लिंबू चमचा, धावणे इत्यादी. स्पर्धा आनंदाच्या वातावरणात घेण्यात आल्या. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष श्री खारके साहेब यांनी सर्व विद्यार्थ्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर

# आ. प्रकाश सोळुंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करा : विश्वास शिनगारे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अभ्यासु, विकासाची जाण असलेले सर्वसामान्यांचे नेतृत्व प्रकाश सोळके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी राष्ट्रवादी चे कार्यकर्ते .विश्वास . शिनगारे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी प्रकाश सोळंके यांना विधानसभेत निवडून पाठवले असून त्यांना मतदार संघाच्या विकासाची जाण आहे तसेच बीड जिल्ह्यात विकासात्म क कामे करायची असतील तर दूरदृष्टीनेता म्हणून प्रकाश सोळंके यांना मंत्रिपद देऊन जनतेची सेवा करण्याची संधी पक्षश्रेष्ठीने देणे



गरजेचे आहे. प्रकाश दादा हे मतदारसंघात विविध विकासात्मक कामे करण्यात तरबेज आहेत आज या भागातील शेतकरी समृद्ध झाला आहे तसेच आमदार प्रकाश दादा यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली असुन

▶▶ उर्वरित पान २ वर

# राज्यमंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या आ. प्रकाशदादा सोळंके यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा

## सभापती नरवडे उपसभापती मोरे यांची पक्षश्रेष्ठीकडे मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघाचा विकास आ.प्रकाश सोळंके यांनीच केला आहे. आणि विकासाचा जो बॅगलॉग राहिला आहे. तो पूर्ण करण्याची धमक ही आ.प्रकाशदादा सोळंके यांचीच आहे.त्यामुळे विकास पुरुष असणाऱ्या व राज्य मंत्रिपदाचा अनुभव असणाऱ्या प्रकाशदादांचा पुन्हा मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागनी बाजार समितीचे सभापती जयदत्तआण्णा नरवडे व उपसभापती श्रीहरीनाना मोरे यांनी पक्षश्रेटीकडे केली आहे.

माजलगाव मतदार संघात विकासाची मुहूर्तमेढ माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांनी रोवली आहे. तोच आदर्श आ. प्रकाश सोळुंके यांनी मतदारसंघात सुरू करून विकासाची गंगा या ठिकाणी ओढून आणली आहे. राज्यमंत्रीपदाच्या आपल्या कार्यकाळात त्यांनी मतदार संघाचा कायापालट केला आहे. मंत्री पदाचा त्यांना अनुभव आहे.मतदारसंघात जो विकास झाला आहे,तो आ. प्रकाश सोळंके यांच्या नेतृत्वाखाली झाला आहे.त्यामुळे नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मतदार संघातील



मतदारांनी आ. प्रकाश सोळंके यांना पाचव्यांदा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी दिली आहे.मागील तीस वर्षांमध्ये आ.प्रकाश सोळंके यांनी मोठ्या प्रमाणात विवीध विकासकामे केली आहेत.

विद्यार्थ्यांचे, सुशिक्षित बेरोजगारांचे, त्याचप्रमाणे जलसिंचनाचे, अनेक प्रश्न मार्गी लावल्याने बहुतांशी शेतकरी आज समृध्द झाला आहे. विकासाचे अनेक कामे झाली आहेत.उर्वरित विकासाचा जो बॅकलॉग भरून काढायचा आहे, तोही आ. प्रकाश सोळंकेच काढू शकतात. विकासाची दूरदृष्टी त्यांच्याकडे आहे.मंत्री पदाचा अनुभवही त्यांच्याकडे आहे त्यामुळे आ. प्रकाशदादा सोळंके यांना मंत्रिमंडळात समावेश करण्याची मागणी बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे व उपसभापती श्रीहरी मोरे यांनी शिष्टमंडळाद्वारे पक्षश्रेष्ठीकडे केली आहे.